इ. १० वी, इ. ११ वी व इ. १२ वी च्या
परीक्षेशी समकक्ष परीक्षा

59

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसएससी २००५/(३४१/०५)/उमाशि २
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० जून, २००५.

**शासन निर्णय :**

राज्यात इ. १० वी व इ. १२ वी च्या परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जातात. देशात, तसेच परदेशात शैक्षणिक संस्था/ मंडळे/ परिषदा यांच्यामार्फत इ. १० वी, इ. ११ वी व इ.१२ वी च्या परीक्षा घेण्यात येत असतात.

२. या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या यादीत नमूद केलेल्या परीक्षा या राज्य मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या इ. १० वी, इ. ११ वी च्या परीक्षांशी समकक्ष राहतील. तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांनी जाहीर केलेल्या यादीत नमूद केलेल्या परीक्षा राज्य मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या इ. १२ वी च्या परीक्षेशी समकक्ष राहतील. सदर यादीत विद्यार्थी कोणत्या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेवू शकेल हे नमूद करण्यात आलेले आहे. राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इ. १० वी व इ. ११ वी ची समकक्षता म्हणजेच अनुक्रमे इ. ११ वी व इ. १२ वी च्या प्रवेशाची पात्रता निश्चित करण्यात आलेली असून, असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली यांच्यामार्फत इ. १२ वी च्या समकक्षता म्हणजेच प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. राज्यमंडळ तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांनी जाहीर केलेल्या समकक्ष परीक्षांची यादी दरवर्षी आवश्यकता असल्यास अद्ययावत करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुवर्णा सि. खरात)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
विभागीय अध्यक्ष, सर्व विभागीय मंडळे.
विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे.
शिक्षण संचालक (माध्यमिक / उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद.
राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलसचिव.
शिक्षण संचालक (प्राथमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
शिक्षण संचालक ...